# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक २५७/२०२४** **दिनांक:- ०५/०७/२०२४.**

## "बँक खात्यात चुकुन पैसे पाठविल्याचे खोटे सांगुन ऑनलाईन फसवणुक केलेली २२,४९३/- रु रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारदार नामे श्रीमती. त्रिवेदी यांना अनोळखी इसमाने फोन करुन त्यांचे खात्यात चुकुन पैसे ट्रान्सफर झाल्याचे सांगितले. त्यानंतर सदरची रक्कम परत करण्यास सांगुन तक्रारदार यांनी २२,४९३/- रु ची फसवणुक झाल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर पोलीस ठाणे येथे प्राप्त करण्यात आलेला होता.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र. १४०२/२०२४ दिनांक १५/०६/२०२४.)**

वरील प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे व्यवहारचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम Flipkart या ऑनलाईन मर्चंट यांचेद्वारे पुढे वर्ग झालेली माहिति प्राप्त झाली. त्यानंतर तक्रारदार यांची वर्ग झालेली रक्कम तात्काळ गोठवुन त्यांचे मुळ खात्यात वर्ग होणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला. **त्या अनुषंगाने तक्रारदार यांची फसवणुक झालेली २२,४९३/- रु त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

**फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अनोळखी इसमांकडुन प्राप्त मॅसेज/ फोनची पडताळणी केल्याशिवाय कोणतेही व्यवहार करु नये.**
- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० तसेच www.cybercrime.gov.in वर संपर्क करुन आपली तक्रार नोंदवावी.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१३१०४ पल्लवी निकम, पोअं/१७०५३ शुभम कांबळे मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे, मसुब/ प्रविण सावंत यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**